[Type text]

| ग्रामपंचायत विभाग,जिल्हा परिषद रत्नागिरी | |
|---|---|
| दुरध्वनी क्रमांक - ०२३५२-२२२५९१ | जा.क्र.रजिप/साप्रवि/ग्रापं/कार्या-६/ ४२१० /२०१९ |
| ई-मेल - vprtn@yahoo.in | दिनांक - २९ / ६ /२०१९ |

प्रति,
मा.जिल्हाधिकारी
रत्नागिरी

विषय:-पावसाच्या पाण्याचा निचरा न झाल्यास उदभवणा-या पुरामध्ये होणा-या हानी व जिवितांच्या धोक्याविषयी.

संदर्भ:-१)डॉ.सुवर्णा दत्तात्रय केतकर यांची लोकशाही दिनांतील तक्रार.
२) तहसिलदार जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी यांचे दि.४.६.२०१९ रोजीचे पत्र.
३) गटविकास अधिकारी पंचायत समिती रत्नागिरी यांचेकडिल पत्र क्र.पंसर/लो.दि./विअचौ/ ३७३५/ २०१९/दि.२९.६.२०१९.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार डॉ.सुवर्णा दत्तात्रय केतकर यांनी लोकशाही दिनात दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने गटविकास अधिकारी पंचायत समिती रत्नागिरी यांचा अहवाल खालील प्रमाणे या कार्यालयाकडे प्राप्त झाला आहे.

डॉ.सुवर्णा दत्तात्रय केतकर यांच्या घरासमोरील रस्त्याला यापूर्वीच गटाराचे बांधकाम ग्रामपंचायतीकडून करण्यात आलेले आहे.ग्रामपंचायतीकडे उपलब्ध निधीतून सदरचे काम पूर्ण करण्यात आलेले असून उर्वरित काम निधी उपलब्धतेनुसार करण्यात येणार आहे.सद्यस्थितीत सदर रस्त्यावर मातीचे ढिगारे दगड कचरा निदर्शनास आलेला नाही.तसेच त्याठिकाणी कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होत नाही.तसचे पावसाळयापूर्वी रस्त्याची साफसफाई,गटाराची साफसफाई तसेच वहाळीत कचरा व माती ग्रामपंचायतीने काढलेली असल्याने पावसाचे पाणी तक्रारदार यांच्या त्यांच्या घराकडे जाण्याचा प्रश्न उदभवत नाही.तसेच कोणत्याही प्रकारचा पाण्यामुळे अडथळा निर्माण होत नाही.त्यामुळे पावसाच्या पाण्याने कोणतेही नुकसान होणार नाही.याची खबरदारी ग्रामपंचायतीने घेतलेली आहे.तसेच त्या रस्त्यालगत शिल्लक राहिलेले गटाराचे काम ग्रामपंचायतीने प्रस्तावित केलेले असून निधी उपलब्धतेनुसार तात्काळ करण्यात येईल.

तसेच शिरगांव येथील मत्स महाविद्यालयाला स्वच्छता राखणेबाबत तसेच गटाराची साफसफाई करणेबाबत ग्रामपंचायतीने कळविलेले आहे तरी सदर प्रकरण आपलेकडिल लोकशाही दिनातून निकाली ठेवणेस विनंती आहे.

आपली विश्वासू

(signature)

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,रत्नागिरीकरिता

Scanned by CamScanner